| | |
|---|---|
| **पुणे महानगरपालिका** | नगरसचिव |
| **स्थायी समिती सभा** | विषय क्र. १६२९ ते १६७० |
| **कार्यपत्रिका क्र.३६, दि. २४/११/२०१५** | दा. वि.क्र. -- ते -- |
| **सभा क्र.५०,दि.२६/११/२०१५ चा वृत्तांत** | ठराव क्र. १६२९ ते १६७० |

स्थायी समितीची तहकूब सभा गुरूवार, दिनांक २६/११/२०१५ रोजी सकाळी ११.३० वाजता म.ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समितीच्या सभागृहात) भरली होती.

सदर सभेस खालील मा.सभासद उपस्थित होते.

१. मा. सौ.कदम अश्विनी नितिन – अध्यक्षा
२. मा. अलगुडे मुकारी आण्णा

३. मा.सौ.आंदेकर राजश्री सुर्यकांत
४. मा.सौ.ओरसे शारदा शंकर
५. मा.कर्णे (गुरूजी) बापूराव गंगाराम
६. मा.ॲड.कदम रामचंद्र उर्फ चंदुशेठ आत्माराम
७. मा.केमसे शंकर दत्तात्रय, सभागृहनेते
८. मा.सौ.ओसवाल दिपाली प्रमोद
९. मा.जगताप बाळा उर्फ श्रीकांत शशिकांत
१०. मा. सौ.टिळक मुक्ता शैलेश
११. मा.तुपेरे राहूल बापू
१२. मा.बागवे अविनाश रमेश
१३. मा.सौ.बाबर आरती साईनाथ
१४. मा. राणे अनिल बाबूराव
१५. मा.सौ.लोणकर नंदा नारायण
१६. मा.शिळीमकर राजेंद्र यशवंत

खालील निमंत्रित इतर मा.सभासद निमंत्रणावरुन उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| मा. | मा. | मा. | मा. |
| मा. | मा. | मा. | मा. |

लघुलेखक :-

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

१. मा. कुणाल कुमार , महापालिका आयुक्त
२. मा. ,अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.)
३. मा. ओमप्रकाश बकोरिया,अति. महा. आयुक्त (वि.)
४. मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)
५. मा.अभिषेक कृष्णा,अध्यक्ष तथा संचालक,पीएमपीएमएल
६. श्री.राजेंद्र शेवाळे, उपनगरसचिव
७. मा.हनुमंत नाझीरकर, प्र.संचालक(ना.वि.यो.)
८. मा.अंबरिष गालिंदे,सह आयुक्त (लेखापरिक्षक)
९. मा. सुहास मापारी,(कआ. व क.सं. प्रमुख)
१०. मा.अनिल पवार, उपायुक्त (विशेष)
११. मा.मोरे दगा पितांबर, उपायुक्त (ग.व.नि.)
१२. मा.प्रकाश बोरसे, उपायुक्त (जिं.घ.)
१३. मा.मंगेश जोशी, उपायुक्त (जनरल)(सेवकवर्ग)
१४. मा.विजय दहीभाते, उपायुक्त (तांत्रिक)
१५. मा.डॉ.एस.टी.परदेशी, प्र.आरोग्यप्रमुख
१६. मा.सौ.उल्का कळस्कर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१७. मा. विलास कानडे, उपायुक्त स्थानिक संस्था कर
१८. मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता
१९. मा.विवेक खरवडकर, अति.नगर अभियंता (पथ) व (जनेयो क्र.१ )
२०. मा. सौ. मिनाक्षी राऊत,शिक्षणाधिकारी, माध्य.व तां.शि.
२१. मा. दहीफळे बबन, शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ
२२. मा.थोरात, प्र.मुख्य विधी अधिकारी
२३. मा.माधव जगताप, प्र.उपायुक्त अतिक्रमण मुख्य सुरक्षाअधिकारी
२४. मा.घोरपडे, सहा.उद्यान अधिक्षक
२५. मा. , उपायुक्त (समाजकल्याण)
२६. मा.श्रीनिवास बोनाला,अति.नगर अभियंता (प्रकल्प व वाहतूक नियोजन व जनेयो क्र.२)
२७. मा.प्रशांत रणपिसे, मुख्य अग्निशामक अधिकारी
२८. मा.शिवाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी
२९. मा.सुनिल केसरी, उपायुक्त (वि.का.१)
३०. मा.ज्ञानेश्वर मोळक, उपायुक्त (वि.का.२)
३१. मा.मधुकांत गरड, उपायुक्त (वि.का.३)
३२. मा.सुरेश जगताप, उपायुक्त (वि.का.४)
३३. मा.किशोरी गद्रे, उपायुक्त (वि.का. घनकचरा व्यवस्थापन)
३४. मा.सतिश कुलकर्णी, उप आयुक्त (भु.जि.)
३५. मा.प्रमोद निरभवणे, अति.नगर अभियंता (पथ)
३६. मा.श्रीनिवास कंदूल, अधीक्षक अभियंता (विद्युत)
३७. मा.श्रीकृष्ण चौधरी, कार्यकारी अभियंता (विद्युत)
३८. मा.ना.न.बारापात्रे, विकास अभियंता, (पथ)
३९. मा.राजेंद्र राऊत, कार्यकारी अभियंता(भवन)
४०. मा.विजय कुलकर्णी,अधी.अभि.(ड्रेनेज व पा.पु.प्रकल्प)
४१. मा.मदन आढारी, अधीक्षक अभियंता
४२. मा.अब्बास पटेल, अधीक्षक अभियंता
४३. मा.संजय मोरे, जनता संपर्क अधिकारी
४४. मा.डॉ.उदय टेकाळे, वि. कार्या.(दक्षता) (सांख्यिकी व संगणक)
४५. मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता (व्हे.डेपो)
४६. मा.मोहिते,(मु.ले.प.कार्यालय)
४७. मा. राहूल जगताप, सांख्यिकी व संगणकप्रमुख
४८. मा.सुभाष पुरी, पं.नेहरू स्टेडियम व्यवस्थापक
४९. मा.अनिरूध्द पावस्कर,कार्य.अभि.(टी.डी.आर. सेल)
५०. मा.त्रिब्यंक धारूरकर, (पी.एम.पी.एम.एल.)

प्रथम मा.स्थायी सभा क्र. ४४, दि.१९/१०/२०१५ चा वृत्तांत कायम करावेत असे सर्वानुमते ठरले.

# पुणे महानगरपालिका

**स्थायी समिती सभा**

**कार्यपत्रिका क्र.३५, दि.२४/११/२०१५**

**सभा क्र.५०,दि.२६/११/२०१५ चा वृत्तांत**

मा.अध्यक्षा–प्रथम श्रध्दाजंली वाहू या.

राजमाता सुशिला राजलक्ष्मी भोसले यांचे निधन झाले. शिक्षणमंत्री विनोद तावडे यांचे वडील श्रीधर रामचंद्र तावडे यांचे निधन झाले. विद्या सहकारी बॅकेचे संस्थापक, अध्यक्ष पोपटराव पोळ यांचे निधन झाले तसेच चौघडा वादक, रमेश आढाव यांचे निधन झाले. जेष्ठ विज्ञान लेखक प्रभाकर सोहनी यांचे निधन झाले. यांनी श्रध्दाजंली वाहण्यासाठी सर्वांनी कृपया उभे रहावे, ही विनंती.

मा.अध्यक्षा–सभा सुरू करावी.

उपनगरसचिव–कार्यपत्रिकेवरील विषय सुरू करीत आहोत.

विषय क्र.१६२९/ ठराव क्र.१६२९

मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.

**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

विषय क्र.१६३०/ ठराव क्र.१६३०

मा.अध्यक्षा–सदर विषयाबाबत प्रशासनाने अभिप्राय द्यावा.

**निर्णय**–सदर विषयाबाबत, मा.महा.आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

विषय क्र.१६३१/ ठराव क्र.१६३१

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१६३२/ ठराव क्र.१६३२

मा.अध्यक्षा–अहवालाची नोंद घेण्यात आली.

**निर्णय**–मा.अति.महा.आयुक्त(इ) यांनी पाठविलेल्या अहवालाची अवलोकन करून नोंद घेण्यात आली.

विषय क्र.१६३३/ ठराव क्र.१६३३

मा.अध्यक्षा– अहवालाची नोंद घेण्यात आली.

**निर्णय**–मा.अति.महा.आयुक्त(इ), यांनी पाठविलेल्या अहवालाची अवलोकन करून नोंद घेण्यात आली.

विषय क्र.१६३४/ ठराव क्र.१६३४

मा.अध्यक्षा– अहवालाची नोंद घेण्यात आली.

**निर्णय**–मा.अति.महा.आयुक्त(इ) यांनी पाठविलेल्या अहवालाची अवलोकन करून नोंद घेण्यात आली.

विषय क्र.१६३५/ ठराव क्र.१६३५

मा.अध्यक्षा– अहवालाची नोंद घेण्यात आली.

**निर्णय**–मा.अति.महा.आयुक्त(इ) यांनी पाठविलेल्या अहवालाची अवलोकन करून नोंद घेण्यात आली.

विषय क्र.१६३६/ ठराव क्र.१६३६

मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.

निर्णय–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

विषय क्र.१६३७/ ठराव क्र.१६३७

मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.

**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

विषय क्र.१६३८/ ठराव क्र.१६३८

मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.

**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

विषय क्र.१६३९/ ठराव क्र.१६३९

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१६४०/ ठराव क्र.१६४०

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१६४१/ ठराव क्र.१६४१

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१६४२/ ठराव क्र.१६४२

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१६४३/ ठराव क्र.१६४३

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय पुढील सभेत घ्यावा.

मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१६४४/ ठराव क्र.१६४४
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१६४५/ ठराव क्र.१६४५
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१६४६/ ठराव क्र.१६४६
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१६४७/ ठराव क्र.१६४७
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१६४८/ ठराव क्र.१६४८
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१६४९/ ठराव क्र.१६४९
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१६५०/ ठराव क्र.१६५०
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१६५१/ ठराव क्र.१६५१
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१६५२/ ठराव क्र.१६५२
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१६५३/ ठराव क्र.१६५३
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१६५४/ ठराव क्र.१६५४
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१६५५/ ठराव क्र.१६५५
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१६५६/ ठराव क्र.१६५६
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–या विषयामध्ये आम्हाला उपसूचना द्यायची आहे की, आपल्याला जी वाहने खरेदी करावयाची आहेत आणि आता या वाहनांच्या बाबतीत नुकतेच राज्य सरकारने असा कायदा केला आहे की, या वाहनांना विशिष्ट ब्रेक्स असले पाहिजेत, त्यामुळे ही वाहने घेत असताना ते ब्रेक्स लावूनच ती वाहने आपल्याकडे आली पाहिजेत.
मा.अध्यक्षा–याबाबत शासनाने जी.आर.काढला आहे का? त्याबाबतची माहिती द्यावी.
मा.किशोर पोळ,कार्य.अभि.(व्हे.डे.)–दि.१ ऑक्टोंबर २०१५ पासून शासनाने हेवी कमर्शिअल व्हेईकल धोरणानुसार ॲक्ट केला आहे आणि स्टेट गर्व्हमेंटने कंम्पलशन केले आहे की, याची अंमलबजावणी करावी परंतु काही ट्रान्सपोटर्स, मॅन्युफक्चर्स याबाबत शासनाकडे गेले होते आणि यामध्ये स्थगिती दिलेली आहे परंतु याच्या अंमलबजावणी बद्दल अद्याप कोणतेही निर्देश आलेले नाहीत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–परंतु शासनाने हे घेऊ नका असे सांगितले आहे का?
मा.किशोर पोळ,कार्य.अभि.(व्हे.डे.)–हे शासनाचे धोरण आहे आणि अद्यापि याबाबत निर्देश आलेले नाहीत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–शासनाने चांगले सांगितलेले आहे आणि ते गरजेचे आहे. त्यामुळे या चॉसीज बरोबर हे सुध्दा लावले गेले पाहिजे.
मा.अध्यक्षा–ही खरेदी करताना त्या पध्दतीने करावी.
मा.राजेंद्र शिळीमकर–आम्ही तशी उपसूचना तयार करतो.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–शासन आदेशानुसार, अे.बी.एस.फोर ब्रेक्स बसविण्यात यावेत.
उपनगरसचिव–विषय क्र.१६५६, मोटार व्हेईकल ॲक्ट, नोटीफिकेशन प्रमाणे कार्यवाही करावी, याप्रमाणे निर्णय असेल.
मा.अध्यक्षा–ठीक आहे.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य, करण्यात आला.

विषय क्र.१६५७/ ठराव क्र.१६५७
मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय मान्य करावा.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१६५८/ ठराव क्र.१६५८
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१६५९/ ठराव क्र.१६५९
मा.अध्यक्षा–वाहनांचे टीपर बांधण्याचे काम कोणाकडून केले जाते? याबाबत माहिती द्यावी.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–या वाहनांचे टीपर टाटा कंपनीकडून बांधून घेण्यात येतात का? याबाबतची माहिती द्यावी.
मा.अध्यक्षा– हा विषय मान्य करावा परंतु, यामध्ये जी कंपनी हे काम करणार आहे, त्यांच्याकडून लिहून घ्यावे की, या वाहनांचे टीपर टाटा कंपनीकडूनच बांधून मिळतील.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य, टाटा कंपनीकडून टीपर बांधून घेणे.
विषय क्र.१६६०/ ठराव क्र.१६६०
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१६६१/ ठराव क्र.१६६१
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१६६२/ ठराव क्र.१६६२
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१६६३/ ठराव क्र.१६६३
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१६६४/ ठराव क्र.१६६४
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१६६५/ ठराव क्र.१६६५
मा.सौ.मुक्ता टिळक– या विषयाची माहिती द्यावी.
मा.अध्यक्षा–या विषयाबाबत माहिती द्यावी.
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–यामध्ये रस्त्यावर राहणाऱ्या कुटूंबातील मुलांसाठी हा प्रकल्प आहे. हा प्रकल्प तीन ठिकाणी आहे. एक श्रीमाळ दवाखाना येरवडा, सोमवार पेठ येथील मनपा शाळा आणि हडपसर बंटर स्कूल येथील हडपसर गाडीतळ. श्रीमाळ दवाखान्यात जो प्रकल्प आहे तिथे १०० मुलांची व्यवस्था आहे आणि या दोन्ही ठिकाणी ६०,६० असे साधारणत: २२० मुलांची व्यवस्था आहे. या सर्व मुलांचा खर्च पुणे महानगरपालिका करते यामध्ये त्याचे जेवण, निवास आणि शिक्षण इ.चा खर्च करण्यात येतो.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण त्यांचा संपूर्ण खर्च करतो का?
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–१०० टक्के खर्च करतो.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण त्यांच्याकडून २० टक्के खर्च घेतो का?
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–त्याबाबत सन २००७ साली ठराव झाला होता. मा.स्थायी समिती ठ.क्र.९२ दि.२२/३/१३ अन्वये त्या संस्थांनी २० टक्के रक्कम भरावी असा प्रस्ताव ठेवला होता. त्यावेळी त्या संस्था तयार झाल्या आणि नंतर त्यांचे असे म्हणणे आले की, आम्हाला हे परवडत नाही. आम्ही हे त्यावेळेला एका विशिष्ट मनस्थितीत दिले होते.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्यावेळी हे किती लोकांनी भरले होते?
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–यामध्ये या तिघांनीही भरले होते आणि त्यावेळी प्रशासनाने सुध्दा असेच म्हणणे होते की, जर हे सामाजिक काम आहे तर त्यामध्ये तुमचे कॉन्ट्रीब्युशन काय असेल? त्यावेळेला त्यांनी २० पर्सेन्ट कॉन्ट्रीब्युशन कबूल केले परंतु आता त्यांनी आमच्याकडे पत्रे दिली, आमच्याकडे बैठक घेतली आणि असे सांगितले की, आम्हाला हे परवडत नाही. आता तुम्ही हे पूर्वीप्रमाणे द्यावे. आता आपले ४ रात्रनिवारे चालू आहेत तिथे सुध्दा आपण १०० टक्के देतो.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–रात्रनिवाऱ्यांचा विषय वेगळा आहे आणि हा विद्यार्थ्यांचा व सामाजिक, एन.जी.ओ.संस्थांचा विषय आहे. यामध्ये त्यांचे कॉन्ट्रीब्युशन असले पाहिजे नाहीतर हा महानगरपालिकेच्या जीवावर बिझनेस होईल.
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–यामध्ये दोन गोष्टींसाठी प्रस्ताव ठेवलेला आहे. एक म्हणजे त्यांना १०० टक्के अनुदान द्यावे आणि दुसरा विषय म्हणजे सन २००७ पासून त्यांना आपण विद्यार्थ्यामागे जो खर्च देतो किंवा तेथील जे सेवक आहेत. त्यांच्याही मानधनात वाढ केलेली नाही. अशा दोन गोष्टींसाठी हा प्रस्ताव ठेवलेला आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–हे कर्मचारी संस्थेचे आहेत का?
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–होय, ते त्या संस्थेचे आहेत.
मा.सौ.मुक्ता टिळक–तिथे महापालिकेचे कोणतेही सेवक नाहीत.
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–तिथे महापालिकेचे सेवक दिलेले नाहीत.
मा.सौ.मुक्ता टिळक–त्याठिकाणी फक्त आपण जागा दिली आहे.

मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–होय.
मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये जागा आपली आहे आणि आपण सन २००७ पासून १०० टक्के अनुदान देत आहोत.
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–होय.
मा.सौ.मुक्ता टिळक–यातील संस्थांची नावे सांगावीत.
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–श्रीमाळ दवाखान्यामध्ये जॉन पॉल स्लम डेव्हलपमेंट प्रोजेक्ट, कोलागीर विद्यालय येथे एकलव्य बालशिक्षण न्यास, आणि हडपसर मध्ये बचपन बचाव या संस्था आहेत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हे प्रस्तावाप्रमाणे असले पाहिजे.
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–हाच प्रस्ताव आपण सन २००७ पासून २०१३ पर्यंत देत होतो. सन २०१३ मध्ये प्रशासनाने यामध्ये कॉन्ट्रीब्युशनबाबत विचारणा केली होती आणि त्यावेळेला आपण पेपरमध्ये जाहिरात दिली. के.वाय.मागविले आणि त्यावेळेला ते तयार झाले होते. परंतु आता ते दोन वर्षापासून आमच्या मागे लागले आहेत की, आम्हाला हे परवडत नाही आणि तुम्ही पूर्वीप्रमाणे १०० टक्के खर्च द्यावा.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–याबद्दल प्रशासनाचे तुमचे मत काय आहे? मला एक कळत नाही की, आपण जेव्हा टर्म ॲण्ड कंडीशन्स टाकून अर्ज मागविले त्यावेळेला ते तयार झाले.
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–यामध्ये दोन बाबी आहेत की, सुरूवातीला सन २००७–०८ पासून आपण १०० टक्के खर्च देत होतो. त्यानंतर आपण सन २०१३ मध्ये सदरचे काम करण्यास कोणी तयार आहेत का? याबद्दल स्वयंसेवी संस्थांकडून अर्ज मागविले होते. त्यावेळेला अर्ज आले परंतु या तीनच संस्थांना प्रकल्प चालविण्याचा अनुभव होता आणि आपण त्यावेळी सांगितले होते की, यामध्ये तुमचे २० पर्सेन्ट कॉन्ट्रीब्युशन असावे. त्यावेळी त्यांनी हे मान्य केले. तथापि हे सुरू झाल्यानंतर काही दिवसांनंतर त्यांनी असे सांगितले की, आम्हाला हे परवडत नाही. आम्हाला पूर्वी प्रमाणे १०० टक्के अनुदान द्या, म्हणून हा प्रस्ताव ठेवला आहे.
मा.अध्यक्षा–एका विद्यार्थ्यामागे किती खर्च येतो?
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–एका विद्यार्थ्यांच्या मागे ५३३५ रू.इतका खर्च येतो.
मा.अध्यक्षा–दरमहा इतका खर्च आहे का?
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–होय, दरमहाचा खर्च आहे.
मा.अध्यक्षा–यामध्ये आपण काय काय देतो?
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–तेथील मुलांना तिथे शिकविण्यासाठी एक शिक्षक असतो आणि प्रत्येक विद्यार्थ्यांला ५०० रू किमतींचे शैक्षणिक साहित्य देण्यात येते. त्या मुलांसाठी दोन ड्रेस खरेदी केले जातात तसेच त्या मुलांना चादर, सतरंजी, बेडशीट,उशी ब्लॅकेंट, चहा नाष्टा व दोन वेळचे जेवण दिले जाते. तसेच मुलांना टूथपेस्ट, साबण व मुलांना कटिंगसाठी पैसे दिले जातात.
मा.सौ.शारदा ओरसे–आम्ही पाहिले आहे की, त्या मुलांना अंघोळीसाठी गरम पाणी सुध्दा दिले जात नव्हते. त्या मुलांना गार पाण्याने अंघोळ करावी लागत होती आणि त्या मुलांना जेवण सुध्दा दुपारी ३.०० वा.दिले जात होते.
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–आपण तो प्रकल्प बंद केला आहे. आम्ही त्यावेळी या प्रकल्पाला व्हिजीट दिली होती आणि या तीनही ठिकाणी गरम पाण्याची व्यवस्था आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हे प्रकल्प गरीब मुलांसाठी चांगले आहेत परंतु या प्रकल्पांवर आपण कधी व्हिजीट करतो का?
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)– यामध्ये आमचे सोशल वर्कर व्हिजीट करतात.
सोशल वर्कर नाही.
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)– माझी स्वत:ची व्हिजीट दोन ते तीन महिन्यातून असते.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण वर्षभर काम केल्यानंतर दोन तीन महिन्यांनंतर व्हिजीट केली तर चालेल का?
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)– तीन महिनेच असे नाही परंतु त्या भागामध्ये मिटींगसाठी गेल्यानंतर व्हिजीट केल्या. परंतु मी त्यांना प्रकल्पात भेटलेलो आहे, त्यांना सूचना दिलेल्या आहेत. तसेच या प्रकल्पामध्ये मी स्वत: जेवण सुध्दा केले आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–या विषयामध्ये प्रशासनाने जी २० टक्क्यांची अट टाकली आहे ती कंटीन्यू करून मान्यता देता येईल.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.गुरूजी माझे वैयक्तिक मत असे आहे की, यामध्ये जर या संस्थांनी हे काम केले नाही तर महानगरपालिका या मुलांसाठी काही काम करणार आहे का?
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)– महानगरपालिका हे करू शकत नाही म्हणून आपण हे स्वयंसेवी संस्थांना देतो.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–त्यामुळे आपण यामध्ये सहानुभूतीने विचार केला पाहिजे. जर हे काम महानगरपालिका करू शकत नसेल आणि एखादी संस्था हे काम करीत असेल आणि एखादी संस्था चालविताना कदाचित यामधील पर्सेन्टेज रक्कम भरण्याची कुवत नसेल परंतु त्यांची काम करायची इच्छा आहे की, या गरीब मुलांची सेवा करावी. यामध्ये काही भ्रष्ट असतील, तर ते सगळीकडेच आहे आणि त्यामुळेच मी असे विचारले की, यामध्ये किती वेळा व्हिजीट करता? तसेच या मुलांच्या जेवणाचा दर्जा तपासला जातो का? मुलांच्या कपड्यांची तपासणी होते का? या मुलांच्या शरीराची निगा राखण्याच्या दृष्टीने अंघोळ, टूथपेस्ट, साबण इ. गोष्टी तसेच साबण देताना कपडयाचा साबण अंगावर लावण्यासाठी दिला जात नाही ना? हे पाहिले पाहिजे कारण समाजामध्ये असे करतात. कारण पूर्वी शिक्षण मंडळामध्ये मुलांना खाऊ देण्यासाठी म्हणून चिवडा, लाडू आणि चार गुलाबजाम द्यायला पाहिजे होते. परंतु मी असे पाहिले की, गुलाबजाम जर चिवड्यामध्ये द्यायचे असतील तर ते सुके असले पाहिजेत आणि ते सुके असतील तर ते आयताकृती असले पाहिजेत आणि ते अंगूर मलाई मधील अंगूर इतके नसावेत. परंतु शिक्षण मंडळाने मुलांना ट्रीपला नेताना खाऊच्या पाकिटामध्ये या आकाराचे गुलाबजाम दिलेले मी पाहिले आहेत तसेच यामध्ये बुंधींच्या मोठ्या लाडवाऐवजी बेसनाचा छोटा लाडू दिलेला मी पाहिला आहे. याप्रमाणे होऊ नये म्हणून या प्रकल्पावर व्हिजीट करण्यासाठी दोन महिने आड नव्हे तर तुमचे अधिकारी नेमून, त्यांनी नेहमी दोन दिवसाआड चक्कर मारली पाहिजे आणि तेथे एक रिपोर्ट कार्ड तयार करा. तुमच्याकडे रिपोर्ट कार्ड आहे का?
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–आम्ही तिथे व्हिजीट केल्यावर तिथे नोंद करतो.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तसे नव्हे, ही नोंद आपल्याकडे असावी. आपण रिपोर्ट तयार करावे आणि संबंधीत अधिकाऱ्यांने तिथे व्हिजीट केल्यानंतर तिथे अशी अशी परिस्थिती दिसली.  तरी सुध्दा जाणारा आणि तिथे असणाऱ्यांमध्ये काहीतरी घोटाळा होण्याची शक्यता आहे. तरी सुध्दा ते तुम्हाला सोपे होईल.
मा.सौ.मुक्ता टिळक– या प्रकल्पामध्ये किती वर्षापर्यंतच्या मुलांना घेतले जाते?
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–मुलांच्या वयाच्या १४ वर्षापर्यंत त्यांना या प्रकल्पामध्ये ठेवले जाते.
मा.सौ.मुक्ता टिळक– हे आपण किती वर्षापासून करीत आहोत?
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–हे साधारणत: ५ वर्षापासून चालू आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक– म्हणजे दरवर्षी मुले बदलतात.
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–मुलाचे वय १४ वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्या संस्थेने त्या मुलाची इतरत्र सोय करायची किंवा त्याला त्याच्या पालकाकडे पाठवून द्यायचे, याप्रमाणे केले जाते.
मा.सौ.मुक्ता टिळक–तो मुलगा १४ वर्षाचा झाल्यानंतर काय?
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–त्यानंतर तो इतरत्र सुध्दा जाऊ शकतो.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण त्या मुलांना शिक्षण सुध्दा देतो का?
मा.नाझीरकर,प्रकल्प संचालक (ना.वि.यो.)–होय.
मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये मुलांचे वय ६ ते १८ वर्षापर्यंत करायला पाहिजे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मग ठीक आहे. मा.गुरूजी, माझी विनंती आहे की, हा विषय मान्य करावा.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–यामध्ये त्या संस्थांचे पार्टसिपेशन असले पाहिजे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मला मान्य आहे परंतु ते हे करायला तयार नाहीत.  आपण हे करू शकत नाही आणि त्या मुलांना जेवण इ. सुविधा मिळण्यामध्ये उशीर होऊ नये, असे माझे म्हणणे आहे.
मा.राजेंद्र शिळीमकर–हा विषय मान्य करावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–त्या संस्थांनी काहीतरी पार्टीसिपेशन दिले पाहिजे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–येरवड्यातील संस्था चांगले काम करते.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–त्या संस्थांनी १० टक्के दिले पाहिजेत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–असे केल्यास, त्या मुलांना कोणीही सुविधा देऊ शकत नाही.
मा.सौ.मुक्ता टिळक–पहिल्यांदा म्हणजे हे महापालिकेचे कामच नाही.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मग शहरातील अशा मुलांना सुविधा कोण देणार?
मा.सौ.मुक्ता टिळक–त्या संबंधीत संस्थांनी सुध्दा पार्टीसिपेशन दिले पाहिजे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–यामध्ये जर या संस्था नको असतील तर, अन्य संस्थांनी पुढे आले पाहिजे.
मा.राजेंद्र शिळीमकर–आम्ही यासाठी तयार आहोत, आम्ही लोकांना २० रूपयांमध्ये जेवण देतो.
मा.अध्यक्षा–यासाठी सी.एस.आर.मधून काही मदत मिळू शकते का? याबाबत प्रशासनाने माहिती घ्यावी.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–सी.एस.आर.मधून निधी म्हणजे आपले पैसे वाचविणे असा उद्देश नसून त्या मुलांना आणखी चांगल्या सुविधा मिळाव्यात हा उद्देश आहे. तसेच श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, पुणे यांच्या सारख्या संस्थां यामध्ये काही मदत करू शकतात का? याबाबत ८ दिवसात माहिती घ्यावी, आणि आता हा विषय मान्य करावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–या संस्थांकडे जे कर्मचारी आहेत, त्यांचे वेतन सुध्दा ते आपल्यावर लादतात हा त्यातील सगळयात मोठा मुद्दा आहे. मुलांना सुविधा मिळाल्या पाहिजेत याबद्दल कोणाचे दुमत नाही.  मुलांना सुविधा मिळाल्याच पाहिजेत. परंतु यातील काही भाग संस्थांनी सुध्दा दिला पाहिजे, असे आमचे मत आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१६६६/ठराव क्र.१६६६
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.अध्यक्षा, हा विषय मान्य करावा.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१६६७ / ठराव क्र.१६६७
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–यामध्ये नगरसचिव कार्यालयाचा समावेश करावा.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य, यामध्ये नगरसचिव कार्यालयाचा समावेश करण्यात यावा.
विषय क्र.१६६८ / ठराव क्र.१६६८
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१६६९ / ठराव क्र.१६६९
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१६७० / ठराव क्र.१६७०
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

मा.सौ.मुक्ता टिळक– शनिवार पेठेमध्ये आग लागली होती आणि ही प्रचंड मोठी आग लागली होती कारण कागदाच्या कारखान्याला आग लागली होती. आपल्याकडून जो पहिला बंब आला तो बंब ऑपरेट होऊ शकला नाही आणि त्यामुळे ती आग मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे याबाबत माहिती द्यावी की, त्यावेळी तो व्हॉल्व का ऑपरेट होऊ शकला नाही? हा प्रॉब्लेम का झाला? ही गाडी किती जुनी आहे?

मा.प्रशांत रणपिसे(मुख्य अग्नीशमन अधिकारी)–सन्माननीय चेअरमन, या आगी दिवाळी मध्ये लागल्या होत्या. लक्ष्मीपूजनच्या दिवशी एकाच वेळी साधारणत: सांयकाळी ७.३० ते रात्री.११.०० वाजेपर्यंत या आगी लागल्या होत्या आणि जवळजवळ सगळया स्टेशन्सच्या गाड्या या आगींवर काम करत होत्या. प्रामुख्याने रास्ता पेठेमध्ये भवानी मंडपवाले येथे मोठी आग लागली होती आणि त्याठिकाणी ४ ते ५ गाड्या काम करीत होत्या आणि त्याचवेळेस ओंकारेश्वर, येथील वाड्यामध्ये असलेल्या कागदाच्या कारखान्याला आग लागली होती. त्याठिकाणी एक गाडी पाठविण्यात आली होती आणि त्यावेळी तिथे गाडी बंद होती किंवा गाडीचा पंम्प ऑपरेट झाला नाही, असे सांगण्यात आले आहे. परंतु असे काहीही झालेले नाही. त्यावेळी पहिली गाडी तिथे पोहचली आणि तिने काम सुरू केले आणि तिथे दुसरी गाडी पाठविण्यात आली. सुरूवातीलाच त्यांनी दुसऱ्या गाडीची मागणी केली आणि आम्ही तिथे पाण्याचा टँकर आणि दुसरी फायर गाडी पाठविली होती आणि त्यांनी ती आग आटोक्यात आणली.

मा.सौ.मुक्ता टिळक–सुरूवातीला जी गाडी पाठविली होती तिचा पंम्प ऑपरेट होत नव्हता त्यामुळे गाडीतील पाण्याचा पूर्ण वापर होऊ शकला नाही.

मा.प्रशांत रणपिसे(मुख्य अग्नीशमन अधिकारी)–मा.अध्यक्षा, मी याबाबत माहिती घेतो.

मा.सौ.मुक्ता टिळक–नंतर गाड्या आल्या परंतु पहिली जी गाडी आली ती नादुरूस्त होती.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–त्यावेळी किती गाड्या पाठविल्या होत्या? आणि त्यापैकी कोणती गाडी नादुरूस्त होती? याबद्दल माहिती द्यावी.

मा.प्रशांत रणपिसे(मुख्य अग्नीशमन अधिकारी)–त्यावेळी मी स्वत: कंट्रोल रूम मध्ये होतो.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–याबद्दलची सर्व माहिती पुढील वेळेस द्यावी.

मा.प्रशांत रणपिसे(मुख्य अग्नीशमन अधिकारी)–याबद्दल माहिती घेऊन सांगतो.

मा.सौ.नंदा लोणकर–मी मागील सभेत विचारणा केली होती की, कोंढवा महात्मा फुले नाट्यगृह येथील नव्याने सुरू झालेले नाट्यगृहामध्ये लाईट गेल्यानंतर, आणि आपले जनरेटर सिस्टीम सुध्दा त्यावेळी बंद होते. याबाबत अहवाल देणार होते परंतु त्याबाबतही कोणतीही माहिती देण्यात आली नाही.

मा.विजय दहीभाते, उपायुक्त(वि)–जनरेटर ऑपरेटर झाला त्यामध्ये तांत्रिक बिघाड होता. त्यामध्ये असे नाही की, तो जनरेटर बंद होता. तो अर्धा ते पाऊण तासामध्ये परत चालू केलेला आहे, आणि तसा लेखी खुलासा दिलेला नाही.

मा.सौ.नंदा लोणकर–तेथे त्यावेळी लहान मुलांचा कार्यक्रम होता आणि एम.एस.सी.बी.ची.लाईट आली नसती तर किती त्रास झाला असता?

मा.विजय दहीभाते, उपायुक्त(वि)– पुन्हा अशी घटना होऊ नये म्हणून आपण योग्य ती व्यवस्था करून ते सुरू करायला सांगितले आहे.

मा.सौ.नंदा लोणकर–ते नाट्यगृह सुरू होऊन सहा महिनेच झाले आहे आणि जर तेथील एम.एस.सी.बी.चा सप्लाय गेला नसता तर ही गोष्ट आपल्या लक्षातच आली नसती.

मा.विजय दहीभाते,उपायुक्त(वि)–यंत्रणा कमी पडली ही वस्तुस्थिती आहे परंतु आम्ही ही व्यवस्था योग्य पध्दतीने चालू करण्यास सांगितले आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आमच्या भागातील झोपड्यामध्ये पावसाचे पाणी शिरले होते आणि आम्ही त्यासाठी अग्नीशामक दलाचा सक्शन पंम्प मागिविला होता. त्यावेळी तिथे फायर बिग्रेड गाडी आली परंतु त्यामध्ये सक्शनिंग पाईप नव्हता. हा पाईप त्या गाडी बरोबर असणे महत्वाचे आहे आणि हे त्यावेळी मागणी करून सुध्दा मिळाले नाही. यामध्ये कोणती अडचण झाली होती? याबाबत माहिती द्यावी.

मा.प्रशांत रणपिसे(मुख्य अग्नीशमन अधिकारी)–सन्माननीय चेअरमन आपल्या फायर बिग्रेडच्या प्रत्येक गाडीला पंम्प बसविलेला असतो. परंतु गढूळ पाणी किंवा मातीचे पाणी आपण त्या पंम्पाने सक्शन करू शकत नाही. कारण जर पंम्पाचा फॉल्ट झाला तर आपल्याला संपूर्ण फायर गाडी बंद ठेवावी लागते. आपल्याकडे पंम्प आहेत आणि त्या दिवशी पर्टिक्युलर लोहगाव आणि त्या भागात जवळ जवळ आपल्याकडे आगीचे ३० कॉल झाले.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्या दिवशी धो–धो पाऊस पडत होता आणि आग कशी लागली? हे मला कळत नाही. आपण काय उत्तर देत आहोत?

मा.प्रशांत रणपिसे(मुख्य अग्नीशमन अधिकारी)–आपण प्रत्येक गाडीला पंम्प दिले आहेत.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्या दिवशी ४ तास धो–धो पाऊस पडत होता आणि तेव्हा कुठे आग लागली? आमच्याकडे जो फायरमन आला होता त्याने सक्शनिंग पंम्प नसल्याचे सांगितले.

मा.प्रशांत रणपिसे(मुख्य अग्नीशमन अधिकारी)–आपण फायर गाडीतून पंम्पिग करीत नाही. त्यासाठी आपण वेगळया पंम्पाचा वापर करतो.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आम्ही १०१ ला दूरध्वनी करून वस्तुस्थिती सांगितली होती की, सगळया घरामध्ये पावसाचे आणि गटाराचे पाणी घुसले आहे आणि सक्शनिंग पंम्प आणावा.

मा.प्रशांत रणपिसे(मुख्य अग्नीशमन अधिकारी)–आपल्याकडे असे ८ पंम्प आहेत आणि एकाच वेळेस असा प्रकार घडल्यामुळे हे झाले आहे आणि दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत या सगळया पंम्पांचे काम सुरू होते.

मा.सौ.नंदा लोणकर–मा.अध्यक्षा, आमच्या प्रभागामध्ये १५ दिवसांपासून सुका कचरा गोळा करण्यासाठी गाडी येत नाही आणि गाडी नादुरूस्त असल्याचे सांगण्यात येते. इतक्या दिवस गाडी नादुरूस्त असते का?

मा.किशोर पोळ,कार्य.अभि.(व्हे.डे.)–मा.अध्यक्षा, आपण त्यासाठी फेअर कॉम्पक्टरसाठी डॉकेट ठेवले आहे आणि जर एखाद्या ठिकाणी गाडी नसेल तर पर्यायी गाडी देता येईल. त्या भागातील कचरा उचलण्यसाठी हायवा आणि जे.सी.बी.ने व्यवस्था केली पाहिजे.

मा.सौ.नंदा लोणकर–त्यांनी ते केले पाहिजे परंतु आम्ही फोन केल्यानंतर आरोग्य विभागाचे मोकादम, बिगारी रजेवर असल्याचे सांगण्यात येते. आम्ही फोन केल्यानंतर ड्रायव्हर रजेवर आहेत असे सांगितले जाते आणि गाडी नाही म्हणून कचरा उचलायचा नाही का? ही कारणे नागरीक ऐकत नाहीत.
मा.किशोर पोळ,कार्य.अभि.(व्हे.डे.)–आम्ही टीपर आणि जे.सी.बी.उपलब्ध करून देतो.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.अध्यक्षा, नादुरूस्त कचऱ्याच्या गाड्या दुरूस्तीसाठी पाठविल्या असता, त्या चार चार महिने दुरूस्त होऊन येत नाहीत. तिथे एवढा वर्क लोड आहे का? आणि आपण ज्या नवीन गाड्या मागविल्या आहेत. त्या सुध्दा अद्याप आलेल्या नाहीत.
मा.किशोर पोळ,कार्य.अभि.(व्हे.डे.)–मनपाकडे एकूण १०२७ गाड्या आहेत. यामध्ये अग्नीशामक दल, मनपाचे सर्व विभाग आणि मा.पदाधिकारी यांची वाहने आहेत आणि यांच्या मेटेनेन्स करीता फक्त १४४ सेवक आहेत. या खात्यामध्ये जवळपास १५० जागा रिक्त आहेत आणि ड्रायव्हर्सचे सुध्दा ५६५ जागा शेड्युल मान्य असून ३०० जागा सध्या रिक्त आहेत. आपण ठेकेदार पध्दतीने ड्रायव्हर्स घेतो परंतु हे लोक सुरूवातीला कचऱ्यामध्ये काम करतात परंतु बरेच लोक कचऱ्याच्या त्रासामुळे हे काम सोडून जातात, ही वस्तुस्थिती आहे. यामुळे आपल्याला जर ३०० ड्रायव्हर शेड्युल मान्य पदावर भरती करता आले तर डेडीकेटेड काम करून घेता येणे शक्य आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण अडचण सांगितल्यानंतर, त्या जागा भरल्या पाहिजेत. परंतु हे कोणी करायचे?
मा.किशोर पोळ,कार्य.अभि.(व्हे.डे.)–याबाबत माझा मा.उपायुक्त (ज ) यांच्याकडे वैयक्तिक पाठपुरावा चालू आहे.
मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(इ)–आपल्याकडे जो नवीन रिक्रूटमेंट रूल आणि आकृतीबंध आला आहे परंतु नव्याने कोणतीही भरती करायची नाही कारण जोपर्यंत जनरल बॉडी, राज्य सरकारच्या मध्ये एकमत होत नाही. त्यामुळे आपल्या कर्मचाऱ्यांच्या ज्या बढत्या होत्या तेवढेच प्रमोशन आकृतीबंधानुसार केले आहेत. यामध्ये ज्या अत्यावश्यक सेवा आहेत. उदा.फायर डिपार्टमेंट, आरोग्य विभाग किंवा व्हेईकल डेपो इ. सारख्या विभागाने नव्याने भरती करण्यासाठी सेवकवर्गाच्या माध्यमातून मा.महा.आयुक्त साहेबांकडे निवेदन ठेवण्यात आले आहे की, ही पदे आपल्याला प्राधान्याने भरावी लागतील. परंतु त्यामध्ये असे कळविले आहे की, चालू वर्षामध्ये कोणतीही पदे भरू नयेत आणि पुढील ३ वर्षामध्ये आपण ३०,३० टक्क्यांच्या टप्याने आपण भरती करण्यास सुरूवात करणार आहोत. कारण महानगरपालिकेवर एकदम लोड येईल. त्यामुळे यामध्ये आपल्याला प्रामुख्याने असे करावे लागेल की, पहिल्यांदा लोकांना प्रमोशन्स द्यावे लागतील आणि बाहेरून जो स्टाफ घ्यायचा आहे तो रिक्रूट करावा लागेल. आपल्याकडे जो स्टाफ नाही तो स्टाफ आपण कॉन्ट्रॅक्टर बेसवर, आपण त्या त्या डिपार्टमेंटला देत आलो आहोत. व्हेईकल डेपोला जरी स्टाफ आवश्यक असेल तर आपण त्यांना कॉन्ट्रॅक्ट बेसवर सुध्दा सप्लाय करतो. कदाचित त्याची असलेली मागणी आणि आपली क्षमता, ही प्रत्येक विभागामध्ये कमी जास्त प्रमाणात आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हे इतक्या मोठ्या प्रमाणात आहे आणि सगळयांचे काम त्यामुळे अडून राहत आहे.
मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(इ)–आम्ही याबाबत सेवक वर्गाबरोबर एक जॉईन्ट मिटींग आयोजित करू.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.अध्यक्षा, किटक प्रतिबंध विभागाकडे आवश्यक असलेली तरतूद संपली आहे आणि तरतूद नसल्यामुळे कामकाज बंद आहे? अशी वस्तुस्थिती आहे का? याबद्दल माहिती द्यावी.
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–मा.अध्यक्षा, या कामासाठी ८५ लाख रू.ची तरतूद होती आणि मागील महिन्यामध्ये ही तरतूद संपली आहे. ही बाब खरी आहे. ही तरतूद कमी आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–इतर खात्यांनी मागणी केली होती मग त्याप्रमाणात तुम्ही मागणी का केली नाही?
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपल्याला आवश्यकता असेपर्यंत खात्याचे जादा काम करणे, हे ठेकेदाराला बंधनकारक राहील. हे असे ठरलेले आहे आणि त्यासाठी रक्कम कमी पडली तरी सुध्दा ते काम कंटीन्यु करायचे हे ठरलेले आहे परंतु तुमचे पैसे संपले आणि पुणे शहरामध्ये डेंग्यूचा प्रसार होत आहे. आपण यावर कोणती उपाययोजना करणार आहात?
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–त्यासाठी आर्थिक तरतूद नसल्यामुळे ते थांबविले आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हे असे कसे चालेल?
मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्यामध्ये क्लॉज टाकलेला आहे की, तरतूद होईपर्यंत त्याने दीडपटीचे काम चालू ठेवावे.
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–सर, आपली ती सूचना योग्य होती आणि आपण जी ८५ लाख रू.ची वर्क ऑर्डर दिली होती त्यानुसार त्यांनी साडेतीन महिने हे काम केले आहे. हे झाले आहे परंतु तो ठराव करताना, रक्कमेपर्यंतचे टेंडर द्यावे, असा उल्लेख आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–डॉकेट १२ महिन्यांचे ठेवले होते आणि माझे मत असे आहे की, रोगराई ठराविक काळातच येणार, तीन महिन्यांनंतर येणार नाही असे होते का?
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–तसे होत नाही.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–महानगरपालिकेने दक्षता घेणे, हे आपले काम आहे की नाही? बाराही महिने किटनाशकांच्या दृष्टीने काम करणे हे आपले काम आहे की नाही? की, हे काम पावसाळ्यात करावे आणि उन्हाळा, हिवाळयामध्ये करू नये असे आहे का?
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–ते १२ महिने करावे लागते.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मग तुम्ही तरतूद कमी का केली?
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–आपण तरतूद मागितली होती परंतु ती मिळाली नाही.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ती का मिळाली नाही? याबाबत माहिती द्यावी.
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–आम्ही यासाठी २ कोटी रू.ची तरतूद मागितली होती.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आता हे काम कंटीन्यू करण्यासाठी आपण तशी मागणी केली आहे का?
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–आपण ती मागणी केली आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण ही मागणी कोणाकडे केली आहे?
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–सर, दीडपटसाठी प्रपोजल ठेवत आहोत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–दीडपट नव्हे हे काम बाराही महिने चालू राहील, अशी व्यवस्था केली आहे का?
मा.राजेंद्र शिळीमकर–आता काम चालू करण्यास कोणती अडचण आहे? यामध्ये पश्चात मान्यता घ्यावी आणि हे काम कंटीन्यु चालू ठेवावे.
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–सर, त्यासाठी आर्थिक तरतूद आवश्यक असते आम्ही त्यामध्ये अखर्चिक असे लिहतो.
मा.राजेंद्र शिळीमकर–अत्यावश्यक सेवेमध्ये झाडण कामाचे जसे सुरू ठेवतो.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण एखादे बजेट हेड सुचविले पाहिजे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मुद्दा हा आहे की, यामध्ये पैसे महत्वाचे नाहीत. हे काम चालू राहिले पाहिजे. एखादा नागरीक जर दगावला तर ती तुमची जबाबदारी आहे.
मा.राजेंद्र शिळीमकर–त्यांनी अगोदर काळजी घेतली नाही.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये जे काही करायचे आहे ते त्यांनी करावे. पुणेकरांचा याच्याशी काहीही संबंध नाही.
मा.राजेंद्र शिळीमकर–यासाठी टेंडर काढा आणि त्यामधून त्यांचे बिल द्यावे आणि यासाठी पश्चात मान्यता घ्यावी.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यासाठी कोठूनही तरतूद करा परंतु यामध्ये जर नागरीक दगावले तर यासाठी तुम्ही जबाबदार राहणार आहात का?
मा.राजेंद्र शिळीमकर–यामध्ये जर पुढे असे होणार होते तर यासाठी अगोदरच का काळजी घेतली नाही?
मा.सौ.मुक्ता टिळक–प्रत्येक खात्यामध्ये अशीच परिस्थिती आहे. आपण बजेट करतो म्हणजे नक्की काय करतो? अशा कामांसाठी तर अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद असेल तर हे प्रश्न येणारच नाहीत. प्रत्येक खात्यात असे का? सुरक्षारक्षक विभागात ११०० ची मागणी होती आणि ८०० ते ९०० ची तरतूद उपलब्ध होती. हे असे कसे?
मा.राजेंद्र शिळीमकर–अत्यावश्यक सेवेमध्ये तर असे होऊ नये.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये क्लॉज असा आहे की, या कामाची मुदत १२ महिने असून ती दि.१.८.२०१५ पासून मोजण्यात येईल आणि हा महिना कोणता आहे? यामध्ये ३ महिने सुध्दा संपले नाहीत. यामध्ये तीन महिन्यांमध्ये तुम्हाला ८५ लाख रू.पुरत नाहीत आणि यावर काम करणे गरजेचे आहे. किटकनाशक फवारणीचे काम झाले नाही तर, रोगराई वाढेल की नाही?
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–वाढेल.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ते करायला पाहिजे.
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–सर, ते अखर्चित रक्कम मधून, दीडपट याप्रमाणे करता येईल.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तुम्हाला जे काही करायचे आहे ते करा आणि याबाबतचे डॉकेट मा.स्थायी समितीकडे सादर करावे. आपणास याची गरज आहे का?
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–याची गरज आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–डॉकेट सादर करावे आम्ही मान्यता देऊ, तुम्ही कोठूनही निधी उपलब्ध करून घ्या. आम्हाला त्याचेशी कोणतेही घेणे नाही.
मा.राजेंद्र शिळीमकर–आपण त्याच कॉन्ट्रक्टरला वाढीव देणार आहात का?
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–दीडपट देणार आहोत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–श्रीमती कळस्कर मॅडम, आपण किटकनाशक बाबत काय करणार आहात?
मा.सौ.उल्का कळस्कर(मुख्य लेखापाल)– हे अखर्चित रक्कमेमधून करता येणार नाही.
मा.राजेंद्र शिळीमकर–हे का करता येणार नाही? जी शिल्लक आहे त्यामधून हे करून द्यावे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–बजेट हेड
मा.राजेंद्र शिळीमकर–ते मार्च महिन्यामध्ये करता येईल आणि आता हे करू शकतात. मा.अध्यक्षा, यामध्ये वेळ काढू नका. अखर्चित मध्ये आपले विषय सुध्दा आहेत. त्यामुळे वेळ काढू नका. हे अखर्चित मधून करून द्या.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–एवढ्या महत्वाच्या विषयाकडे योग्य पध्दतीने पाहिले जात नाही आणि हे इतके दुर्दैव काय आहे? आपण पुणेकरांच्या जीवाशी खेळ करीत आहोत. काही ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, त्यांचे जगणे असह्य होत आहे किटकनाशक औषधे नसल्यामुळे तेथे डास आणि किडे होत आहेत आणि आपण काय करीत आहोत? आम्ही आमच्याकडे पैसे नाहीत, असे म्हणतो!
मा.सौ.नंदा लोणकर–प्रत्येक वॉर्डात डेंग्यूचे पेशंट वाढले आहेत आणि ते असे म्हणतात की, आमच्याकडे औषध, धूर फवारणीसाठी माणसे उपलब्ध नाहीत.
मा.राजेंद्र शिळीमकर–आपले एक सभासद, मा.सौ.शिवरकरताई, के.ई.एम.हॉस्पीटल मध्ये ॲडमिट आहेत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मग आपण असा खेळ का करीत आहोत.
मा.राजेंद्र शिळीमकर–हे अत्यावश्यक सेवेशी संबंधीत आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–महत्वाचे म्हणजे पुणेकर जगले तर आपण जगाल, कारण तुमचे सगळ्याचे पगार आणि आमचेही मानधन त्यांच्याकडून येते.हे पुणेकरांच्या जीवावर होत आहे. आपण दोघेही इथे मजा करीत आहोत आणि पुणेकर तिकडे हालअपेष्टा सहन करीत आहेत. ही गोष्ट चालणार नाही.
मा.राजेंद्र शिळीमकर–कायदेशीर बजेट हेड किंवा अखर्चित मधून करावे परंतु हे काम चालू ठेवावे.
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–ठीक आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हे काम चालू ठेवावे. तसेच आरोग्य खात्याकडील क्षयरोग विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या सानुग्रह अनुदानाच्या बाबतीत काही अडचणी झाल्या आहेत का? अशी कामे कोणी करीत नाहीत, म्हणून तर आपण त्यांना देत आहोत.
मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(इ)–याबाबत आम्ही मा.महा.आयुक्त साहेब यांच्याशी चर्चा करू.
हे सर्व असे पुणे महानगरपालिकेमध्येच होत आहे.
मा.अध्यक्षा–या विषयाबाबत माहिती द्यावी.
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–मा.महा.आयुक्त साहेबांनी, यावर सदरचा प्रस्ताव कायदेशीर आहे का? असा शेरा लिहला आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हे बेकायदेशीर आहे का?
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–हे कायदेशीर आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण कोणालाही सेवा न घेता, वाटायला निघालो आहोत का? ते लोक आपल्याकडे काम करतात.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हे लोक आपल्याकडे किती वर्षापासून काम करीत आहेत?
मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–हे लोक ११ वर्षापासून आपल्याकडे काम करीत आहेत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–जे कर्मचारी क्षयरोग सारख्या विषयामध्ये ११ वर्षापासून काम करीत आहेत आणि त्यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत, हे कायद्यामध्ये बसत नाही. कुटूंबातील सदस्याला जरी क्षयरोग झाला तर आपण आपली नजर वाकडी करतो आणि हे कर्मचारी तर हीच कामे करीत आहेत. मा.आरोग्यप्रमुख, या विषयाबाबत आमच्या कमिटीच्या तीव्र भावना आहेत आणि तुम्ही त्या मा.महा.आयुक्त साहेबांपर्यंत पोहचवाव्यात. हे सानुग्रह अनुदान त्या कर्मचाऱ्यांना दिले गेले पाहिजे. अन्यथा तुमच्याकडे कोणीही कामाला येणार नाही आणि तुम्ही फक्त मुख्य अधिकारी म्हणून कार्यरत रहाल. तुमच्या हाताखाली कोणीच येणार नाही. तुम्ही या सगळ्यांना वेठबिगार समजता का? या विषयाबाबत प्रशासनाचा होकार किंवा नकार असेल ती माहिती पुढील मंगळवार पर्यंत माहिती द्यावी. अन्यथा आम्ही आमच्याकडून पुन्हा ठराव करून देतो.

मा.राजेंद्र शिळीमकर–मा.अध्यक्षा, शिक्षण मंडळाकडून विद्यार्थ्यांसाठी स्वेटर किंवा खरेदी करण्यात येते. या स्वेटरचा दर्जा तपासण्यासाठी ते कोणत्या लॅबोरेटरीमध्ये पाठविण्यात येते? आपल्याकडे अशा ॲथाराईज्ड किती लॅबोरेटरीज आहेत?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–एकूण १५ लॅब आहेत.

मा.राजेंद्र शिळीमकर–मग हे सगळे एकाच लॅबोरेटरीमध्ये का जाते?

मा.दहीफळे (शिक्षणप्रमुख)–यातील काही लॅब पॉलिस्टरसाठी तर काही पेपरसाठी आहेत तर काही लॅबोरेटरीज औषधांसाठी आहेत.

मा.राजेंद्र शिळीमकर–स्वेटरचा दर्जा तपासण्यासाठी किती लॅब आहेत?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–त्यासाठी तीन लॅबोरेटरीज आहेत.

मा.राजेंद्र शिळीमकर–आपण ही तपासणी तीनही लॅबोरेटरीजकडे पाठवित नाही का? आपण हे एकाच लॅबोरेटरीकडे पाठवितो का? मा.अध्यक्षा, हे गंभीर आहे की, त्या लॅबोरेटरीकडून ठेकेदाराला फोन येतात आणि त्यांना विचारले जाते की, तुमचे सॅम्पल पास करायचे की नाही? हे तुम्हाला घ्यायचे की नाही? हा अतिशय गंभीर विषय आहे. याबाबत चौकशी करावी आणि आता तुम्ही जर वर्क ऑर्डर दिल्या असतील किंवा ज्याचे टेस्टींग आले आहे ते थांबवा आणि यामध्ये जे अपात्र झाले आहेत त्यांची सॅम्पल्स पुन्हा दुसऱ्या लॅबमध्ये पाठवा आणि ते लोक पुन्हा पात्र होतात का? याबाबत पाहणी करावी आणि त्या लॅब मध्ये पुन्हा तपासणीसाठी काही पाठवू नका. हे सॅम्पल्स दुसरीकडे टेस्टींगसाठी पाठवावेत. ही बाब आपल्या कानावर आली आहे का?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–याबाबत तोंडी तक्रार आली आहे.

मा.राजेंद्र शिळीमकर–मा.अध्यक्षा, आता मा.शिक्षण अधिकारी सांगत आहे की, याबाबत लेखी तक्रार आली नाही परंतु तोंडी तक्रारी आल्या नाहीत. त्यांच्याबाबतीत तक्रारी आल्या असतील आणि त्या लॅबचा रिपोर्ट जर चुकीचा असेल तर त्यांनी दिलेला कोणताही टेस्टींग रिपोर्ट मान्य न करता ते दुसऱ्या लॅबोरेटरीकडे पाठविण्यात यावे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण वर्क ऑर्डर दिली आहे का?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.अध्यक्षा, याबाबत आपण टेंडर पाकिट फोडलेले आहे आणि दरपत्रक.

मा.राजेंद्र शिळीमकर–ते टेंडर रिकॉल करा.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण वर्क ऑर्डर दिली आहे का?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–आता तयार केली आहे. ती त्यांना द्यायची आहे.

मा.राजेंद्र शिळीमकर–ती देऊ नका.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तुमच्याकडे तक्रार आली आहे त्याचे निरसन न करता आपण का घाई करीत आहात?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.चेअरमन तशी लेखी तक्रार आली नाही.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तुम्हाला लेखीच तक्रार पाहिजे असे काही आहे का?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)– मा.चेअरमन काल हा विषय मा.अति.महा.आयुक्त साहेब आणि मा.आयुक्त साहेब यांच्याकडे मांडला आहे. यावर त्यांनी असे सांगितले आहे की, दरपत्रक फोडले आहे आणि यामुळे उशीर होऊ शकतो व ही बाब न्यायप्रविष्ट होऊ शकते म्हणून ज्यांचे दर कमी आहेत त्यांना..

मा.राजेंद्र शिळीमकर–ते न्यायालयात गेले तरी चालेल. आपण त्या लॅबवर कारवाई करू.

मा.अध्यक्षा–मा.अति.महा.आयुक्त यांनी तुम्हाला स्वेटरच्या बाबतीत काही आदेश दिले होते का?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.अति.महा.आयुक्त यांनी सर्वांचे सॅम्पल्स पुन्हा एकदा तपासणी पाठवावेत, असे आदेश दिले होते.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तुम्हाला मा.अति.आयुक्त साहेबांनी ऑर्डर करूनही तुम्ही मा.महा.आयुक्त साहेबांकडे का गेले?

मा.दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.चेअरमन, काल मा.महा.आयुक्त, मा.अध्यक्ष, शिक्षण मंडळ आणि सदस्य यांच्या बैठकीमध्ये मा.महा.आयुक्त साहेबांनी वरीलप्रमाणे सांगितले आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तुम्ही याबाबत मा.महा.आयुक्त साहेबांकडे विचारणा केली होती का?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–होय.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–या विषयाबाबत असे करावे, याबाबत मा.महा.आयुक्त साहेबांनी स्वत: तुम्हास सांगितले आहे का?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–होय.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तुम्ही मागणी केली की, मा.महा.आयुक्त साहेबांनी तसे सांगितले होते.

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–त्यावेळी, याबाबत मा.अध्यक्षा व मा.सदस्य यांनी ही बाब सांगितली होती.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तक्रार आली असताना सुध्दा मा.महा.आयुक्त साहेब असे म्हणणार आहेत का?

मा.राजेंद्र शिळीमकर–शिक्षण मंडळ हे भ्रष्टाचाराचे कुरण आहे त्याकडे गांभीर्याने बघितले पाहिजे. आतापर्यंत अनेक वेळा भ्रष्टाचाराचे आरोप झाले आणि ते सिध्द होण्याच्या मार्गावर आहेत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.स्थायी समितीने जर यामध्ये काही आदेश दिले तर तुम्ही काय करणार आहात?

मा.दहीफळे (शिक्षणप्रमुख)–याबाबत जे काही आदेश असतील, ते त्यांच्या समोर नेऊन ठेवतो आणि यामध्ये जी तक्रार आली आहे त्यांच्याकडून लेखी तक्रार..

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–एकाच ठेकेदाराला तीन कामे कशी काय मिळाली? आणि ठेकेदाराला ही सॅम्पल पास करण्याबाबत लॅबकडून विचारणा झाली.

मा.दहीफळे (शिक्षणप्रमुख)–त्याबाबत मी सांगू शकत नाही.
मा.राजेंद्र शिळीमकर–त्यांच्याकडे तोंडी तक्रार आली आहे.
तुमच्याकडे तोंडी तक्रार आली आहे का?
मा.दहीफळे (शिक्षणप्रमुख)– मला याबाबत कोणी काही सांगितले नाही किंवा काही चर्चा झाली नाही.
मा.राजेंद्र शिळीमकर–परंतु आताच आपण तोंडी तक्रार आल्याचे सांगितले होते.
मा.दहीफळे (शिक्षणप्रमुख)–नाही, मला मा.अध्यक्षा, स्थायी समिती आणि मा.सभागृहनेते यांनी मला याबाबत सांगितले होते.
मा.राजेंद्र शिळीमकर–एखाद्या ठिकाणी भ्रष्टाचाराचा संशय आला तर ते त्या ठिकाणी थांबविले पाहिजे किंवा त्याची चौकशी केली पाहिजे.
मा.सौ.नंदा लोणकर–मा.चेअरमन यामध्ये बऱ्याचदा शिक्षण अधिकाऱ्याचा काहीही संबंध नसतो परंतु त्यांच्या खालील श्रेणीत काम करणारे जे क्लार्क इ.स्टाफ असतो त्यांच्या आधी बदल्या कराव्यात. हेच लोक सगळे मिटवितात आणि अधिकाऱ्यांपर्यंत नेतात, असा माझा आरोप आहे.
मा.राजेंद्र शिळीमकर–यामध्ये शिक्षण अधिकाऱ्यांचा दोष आहे, असे आम्हाला म्हणायचे नाही. ती कोणती लॅब आहे ? ते पहा आणि त्यांच्याबाबत शासनाकडे कळवून टाकावे.
मा.अध्यक्षा–ते पुन्हा तपासणी करतील.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–पुन्हा टेस्टींगसाठी किती दिवस लागतात?
मा.दहीफळे (शिक्षणप्रमुख)–यासाठी जर अर्जंन्टमध्ये करावयाचे असल्यांस, तीन ते पाच दिवस लागतात.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तीन ते पाच दिवसांमध्ये शंका निरसन होणार असेल तर मग आपण हे पुन्हा तपासणीसाठी का देत नाही? चार, चार लॅबोरेटरीज आहेत त्यांच्याकडे पाठवून द्यावे.
मा.राजेंद्र शिळीमकर–यामध्ये असे करावे लागेल की, शिक्षण मंडळाकडून अधिकार काढून घ्यावेत, असा आमच्या पार्टीच्यावतीने ठराव द्यावा लागेल. कारण यामध्ये जर असे होत असेल तर त्याचा उपयोग काय आहे?
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–शासनाच्या लॅबोरेटरीज आहेत.
मा.दहीफळे (शिक्षणप्रमुख)– या सर्व लॅबोरेटरीज शासनाने मान्य केल्या आहेत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आणखी शासनाच्या लॅबोरेटरीज आहेत.
मा.दहीफळे (शिक्षणप्रमुख)– नाही, या व्यतिरिक्त लॅब नाहीत.
मा.राजेंद्र शिळीमकर–यामध्ये लॅबोरेटरी, ठेकेदार यांचे संगनमत आहे आणि प्रशासन असे सगळे चक्र आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–या लॅबोरेटरीला किती टक्के काम दिले जाते?
मा.दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.अध्यक्षा, याबाबत आता तसे सांगता येणार नाही.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–अंदाजे जास्तीत जास्त काम कोणाला दिले जाते?
मा.दहीफळे (शिक्षणप्रमुख)– त्याबाबत मी आता सांगू शकणार नाही.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण का सांगू शकणार नाही? तुम्ही अधिकारी आहात.
मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.चेअरमन मला ते अभ्यास करून, पाहून सांगावे लागणार आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तुम्ही तिथे अभ्यास करून बसला आहात आणि तुम्हाला ते माहिती नाही का?
मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)– मा.चेअरमन मागील बाबतीत मी सांगू शकत नाही.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तुम्ही सांगू शकत नाही, असे कसे म्हणू शकता?
मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मला ते पाहून सांगावे लागेल.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–कशासाठी पाहून? तुम्ही ते वाचले नाही का?
मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मागील बाबतीतचे मी वाचले नाही.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ते तुम्ही का वाचले नाही.
मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.चेअरमन..
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तुम्ही अधिकारी आहात. तुम्हाला पार्श्वभूमी माहिती नको का? तुम्हीच लॅबोरेटरीचे नाव सुचविले आहे का? यामध्ये कार्यालयामध्ये जे कोणी कर्मचारी असतात किंवा जे मा.अध्यक्ष असतात त्यांना हे माहिती असते.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते, मा.राजेंद्र शिळीमकर–हे मा.अध्यक्षांनी सांगितले का?
मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–होय.
मा.राजेंद्र शिळीमकर–मा.अध्यक्षांनी सांगितले म्हणजे हे प्रशासन चुकीचा निर्णय घेत आहे.
मा.अध्यक्षा–शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांनी, आपणास सांगितले !
मा.दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.चेअरमन, शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आणि कर्मचारी यांना हे माहिती असते, असे सांगितले
मा.अध्यक्षा–तुम्ही जबाबदारीने उत्तरे द्यावीत.
मा.राजेंद्र शिळीमकर–त्यांनी आता असे सांगितले की, मा.अध्यक्षांनी सांगितले त्यामुळे आता मा.अध्यक्षांची चौकशी करावी.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–याठिकाणी मा.शिक्षणप्रमुख हे थोडेसे गोंधळेले दिसतात, मा.अध्यक्षांना कोणतेही तांत्रिक ज्ञान नसते.
मा.अध्यक्षा–मा.शिक्षण प्रमुख, तुमच्या या एका वाक्याने किती गोंधळ होऊ शकतो? हे आपणास माहिती आहे का? तुम्ही शिक्षणप्रमुख म्हणून त्या खुर्चीत कसे काय बसलात?
मा.राजेंद्र शिळीमकर–यामध्ये मा.अध्यक्षांनी, शिक्षणप्रमुखांवर प्रेशर आणले की, अमूक एका लॅब मध्ये टेस्टींग करा म्हणून तो चुकीचा निर्णय झाला आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.अध्यक्षांना या तांत्रिक बाबी माहिती नसतात, हे सगळे प्रशासन तपासत असते. त्यामुळे मा.अध्यक्षांनी सांगितले हे म्हणणे बरोबर नाही तर ते चुकीचे आहे.
मा.राजेंद्र शिळीमकर–प्रशासन काम करीत असताना, राजकीय हस्तक्षेप करू नये. ते असे म्हणतात की, हे मा.अध्यक्षांनी सांगितले.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये ते असे सांगतात की, हे कर्मचारी आणि अध्यक्षांनी सांगितले. परंतु तुम्ही जर प्रशासकीय प्रमुख आहात आणि कर्मचाऱ्यांने सांगितल्याप्रमाणे तुम्ही ऐकणार आहात का?

मा.राजेंद्र शिळीमकर–मा.अध्यक्षांनी सांगितले की, या लॅबोरेटीस द्या आणि त्यांनी दिले आहे.

मा.अध्यक्षा–मग शासकीय अधिकाऱ्यांची जबाबदारी काय आहे?

मा.राजेंद्र शिळीमकर–त्यांनी आता सांगितले की, मा.अध्यक्षांनी सांगितले. मा.अध्यक्षांनी प्रेशर केले म्हणून त्या लॅबला पाठविले.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये मा.अध्यक्षांचा संबंध काय येतो?

मा.राजेंद्र शिळीमकर–यामध्ये चौकशी करावी लागेल.

मा.अध्यक्षा–आता १० ते १५ लॅबोरेटीज सांगितल्या आहेत आणि जेवढे टेंडर आले आहेत त्या सर्व सॅम्पल्सचे तीन लॅबोरेटरीकडे तपासणीसाठी पाठवावेत.

मा.राजेंद्र शिळीमकर–साहेब, आमचा संशय आहे की, यामध्ये भ्रष्टाचार झाला त्यामुळे चौकशी होईपर्यंत तुम्ही हे टेंडर, वर्कऑर्डर थांबवा.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हे आपल्याला कोणत्या कर्मचाऱ्याने सांगितले होते? याबद्दल माहिती द्या.

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.चेअरमन, त्यावेळी समोर यादी ठेवलेली असते आणि त्या तीन पैकी हे एक लॅब लवकर तपासून देतात. मला याच्या अगोदरचे किंवा नंतरचे..

(सभागृहात गोंधळ सुरू होता)

मा.राजेंद्र शिळीमकर–मा.अध्यक्ष व समितीचे सदस्य, प्रशासनावर प्रेशर आणून चुकीची कामे करीत आहेत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.शिक्षणप्रमुखांनी असे सांगितले का? यापैकी या लॅबोरेटरीकडे तपासणीसाठी द्यावे.

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–त्या निवेदनावर असे नमूद केले होते की, यापैकी या लॅबोरेटरीकडे तपासणीसाठी दिले तरी चालेल. मला त्याबद्दल अगोदरच्या कोणत्याही विषयाची माहिती नव्हती.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–या टेबलवर परंपरेने जे लोक काम करीत आहेत. त्यांच्या या सूचना असतात यांना याबाबी परंपरेने माहिती नाहीत. तुम्ही एकदम मा.अध्यक्षांचे नाव घेणे चुकीचे आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये मा.अध्यक्षांचे नाव घेणे चुकीचे आहे. सॅम्पल्स कोणाकडे टेस्टींग द्यावेत किंवा कोणाकडे देऊ नयेत या बाबीशी त्यांचा काही संबंध येतो का?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–हे मी माझ्या सहीने दिले आहे, हे मी मान्य करीत आहे पण..

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मग तुम्ही दिले असे म्हणा.

मा.राजेंद्र शिळीमकर–मा.अध्यक्षांनी, प्रेशर आणले असल्यास ते कशाला अंगावर घेतील?

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तुम्हाला जमत नसेल तर तुमचे अधिकार ट्रान्सफर करून टाकू.

मा.राहूल तुपेरे–या अधिकाऱ्यांना हे झेपते का? हे पहा.

मा.राजेंद्र शिळीमकर–अध्यक्ष चुकीचा निर्णय घेतात आणि प्रशासनाकडून चुकीचे काम करून घेतात, असे त्यांनी सांगितले आहे.

मा.अध्यक्षा–विद्यार्थ्यांना वेळेत साहित्य मिळाले पाहिजे यासाठी मा.स्थायी समितीने वारंवार काळजी घेतलेली आहे आणि यामध्ये जर मा.सभासदाची तक्रार असेल की, यामध्ये गैरप्रकार झालेला आहे तर तुम्ही हे फक्त एकाच लॅबला का पाठविता? तुम्ही हे सगळया लॅबला का पाठवित नाही? तुम्ही हे सॅम्पल्स किमान लॅबोरेटरीकडे तरी पाठविले पाहिजे.

मा.सौ.मुक्ता टिळक– ते स्वेटर हिवाळयात मिळणार आहेत की उन्हाळयात मिळणार आहेत? आता सद्यस्थिती काय आहे? याबद्दल माहिती सांगावी.

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.चेअरमन मी टेंडरचे दुसरे पाकिट उघडले आणि आज ऑर्डर द्यायची होती परंतु मा.अध्यक्षा, स्थायी समिती यांनी सांगितल्याप्रमाणे हे थांबविले आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.शिक्षणप्रमुख आपण आता दुसऱ्या मा.अध्यक्षांचे नाव, त्या आधी कर्मचाऱ्यांचे नाव घेत आहात. हे सगळे असे होत असल्यांस आपण स्वत:वर कोणती जबाबदारी घेणार आहात? आपण जर स्वत: केले असेल तर तुम्ही ते मान्य केले पाहिजे.

मा.राजेंद्र शिळीमकर–प्रशासनावर प्रेशर आणून करू नये. तुम्ही प्रशासनाला असे कसे म्हणता?

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मग हे कोणी केले?

मा.राजेंद्र शिळीमकर–ते मा.अध्यक्षांचे नाव सांगत आहेत.

आता स्वेटरसंचे स्टेटस काय आहे? किती स्वेटर्स आहेत?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.चेअरमन, दरपत्रक उघडले आहे. आता आदेश द्यायचे आहेत त्या कॉपीवर सही केलेली आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक– त्यांना वर्क ऑर्डर देण्यासाठी आपण कोणता मुर्हूत पहात आहात का?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.चेअरमन, मागील दोन दिवसांपूर्वी दरपत्रक उघडल्यानंतर मा.अध्यक्षा, स्थायी समिती आणि मा.सभागृहनेते यांच्याशी या प्रकाराबाबत चर्चा झाली. त्यानंतर मी मा.अति.आयुक्त, जगताप साहेब, यांच्याकडे हे प्रकरण दाखविले आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक– मा.अध्यक्षा आणि मा.सभागृहनेते यांच्यासोबत कोणती चर्चा झाली?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–यामध्ये तीनच का पास झाले? बाकीच्यांचे पास का झाले नाही? असे विचारले होते आणि त्याबाबत त्यांनी कारण विचारले होते. परंतु मी ते कारण सांगू शकलो नाही.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण कारण सांगावे.

मा.अध्यक्षा–एकच माणूस आहे आणि त्यांचेच तीन मंजूर कसे काय झाले? याचे कारण सांगायला नको का?

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये एकच लॅबोरेटरी आहे आणि तेथून त्यांनी ते मान्य करून आणायचे. यावर मी असे सुध्दा विचारले की, हे सॅम्पल दुसऱ्या लॅबोरेटरीमध्ये का तपासत नाहीत?

मा.राजेंद्र शिळीमकर–मा.अध्यक्षा, यामध्ये जर संशय येत असेल तर, ही प्रोसिजर थांबवा. पुन्हा टेंडर मागवावे. मा.अध्यक्षा, आम्हाला अद्याप गणवेश खरेदीबाबतची उत्तरे मिळाली नाहीत.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.अध्यक्षा, हिवाळयाच्या सिझनमध्येच विद्यार्थ्यांना ही स्वेटर्स मिळाली पाहिजेत.

मा.श्रीकांत जगताप–मा.अध्यक्षा, विद्यार्थ्यांना स्वेटर्स वेळेमध्ये मिळाली पाहिजेत. ती कधी मिळणार आहेत? याबाबत माहिती द्यावी.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–शिक्षण मंडळाने पुढील ३ दिवसांच्या आत दुसऱ्या लॅबोरेटरीकडून या स्वेटर्सच्या दर्जांची तपासणी करून घ्यावी.

मा.अध्यक्षा–यामध्ये मा.अति.महा.आयुक्त साहेबांनी सुध्दा टेस्टींग करून घेण्याबाबत शिक्षणप्रमुखांना ऑर्डर दिली होती. परंतु तेव्हा ही तपासणी केली नाही. मग या दरम्यानच्या दिवस वाया का घालविले?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.अध्यक्षा, यानंतर मा.अध्यक्षा आणि सदस्य शिक्षण मंडळ यांनी सदर विषयाबाबत मा.महा.आयुक्त यांचेसह बैठक घेण्याचे ठरविले. सदरची बैठक काल झाली आणि त्यानुसार हे झाले आहे.

मा.अध्यक्षा–म्हणजेच तुम्ही आमच्या मा.अति.आयुक्त साहेबांचे ऐकत नाही.

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.सदस्य, शिक्षण मंडळ यांच्या सूचनेनुसार मा.आयुक्त साहेबांकडे चर्चा केली आहे.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–यामध्ये मा.महा.आयुक्त साहेबांची प्रशासकीय मान्यता आवश्यक असते. या टेंडरमध्ये ९ लोकांनी भाग घेतला आहे. त्यामधील ६ पात्र झाले आणि तीन लोक अपात्र झाले. त्यानंतर या ६ लोकांच्या सॅम्पल्सचे लॅबोरेटरी टेस्टींग झाले आणि त्यामध्ये तीन सॅम्पल्सचे रिझल्टस ओके आले आणि तीनचे सॅम्पल्स रिझल्टस निगेटीव्ह आले आणि ज्यांचे रिपोर्ट ओ.के.आले होते त्यांची त्यांनी पाकिटे उघडली होती आणि त्या अनुषंगाने आम्ही असे म्हंटले आहे की, आपण जोपर्यंत वर्कऑर्डर दिली नाही त्या दरम्यान इतर तीन सॅम्पल्स सुध्दा दुसऱ्या लॅबमधून तपासणी करून घ्यावेत. आपण अशा प्रकारची कारवाई, पूर्वी आपल्या स्टोअर डिपार्टमेंटकडील साडी सप्लायची तक्रार आल्यानंतर सुध्दा अशी कारवाई घेतली होती तसेच वह्याची तक्रार आल्यानंतर सुध्दा अशीच कार्यवाही केली होती म्हणून आम्ही त्या पध्दतीने आदेश दिले होते.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मागील वेळेस साड्यांची तपासणी केली त्यामध्ये गडबड आढळून आली, वह्यांची तपासणी केली त्यामध्ये गडबड आढळून आली आणि आता सुध्दा स्वेटर्स मध्ये गडबड आढळली. शिक्षण मंडळाने पुढील ३ दिवसांच्या आत या स्वेटर्सची पुन्हा तपासणी करून घ्यावी.

मा.राजेंद्र शिळीमकर–आता त्यांची टेस्टींग केली आणि त्यांचे रेटस ओपन केले आहेत. यावर आपण काय करणार आहोत?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–परत रेट मागविता येणार नाही.

मा.राजेंद्र शिळीमकर–त्यांचे सुध्दा ओपन होणार असतील तर, ठीक आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–त्या गरीब मुलांना बोगस स्वेटर्स देऊन चालणार आहे का?

मा.सौ.मुक्ता टिळक– तपासणीसाठी आजपासून तीन दिवस लागणार की, उद्यापासून तीन दिवस लागणार आहेत? प्रत्यक्ष वर्क ऑर्डर दिल्यानंतर स्वेटर्स वाटपांस किती दिवस लागणार आहेत?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.चेअरमन त्यांच्याकडे पाठविल्यानंतर ३ दिवस लागणार आहेत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ते सॅम्पल्स तपासणीसाठी आजच्या आज पाठवावे. हे टेंडर कोणालाही द्या परंतु विद्यार्थ्यांना दर्जेदार स्वेटर्स मिळाले पाहिजेत.

मा.सौ.नंदा लोणकर–माझ्या प्रभागातील शाळेमधून संगणक चोरीला गेले होते आणि अजून सुध्दा शिक्षण मंडळाने त्या शाळेसाठी शिपाई स्टाफ दिलेला नाही. मी याबद्दल वारंवार पाठपुरावा करीत आहे आणि आमच्या वानवडीच्या शाळेमध्ये रखवालदारांच्या क्वॉर्टर्स मध्ये शिपाई राहतात. मी याबाबत प्रत्येकवेळेस एस.एम.एस.केले आहेत तिथे श्री.म्हसके आणि श्री.सोनावणे हे शिपाई रखवालदारांच्या खोलीमध्ये राहतात. या आधी देखील ते १५ वर्षे या शाळेमध्ये होते. त्यांचे स्वत:चे बिझनेस चालू आहेत, मनमानी चालू आहे. त्यांना जर कामे सांगितली तर ते असे म्हणतात की, आम्ही शिपाई आहोत. आम्ही रखवालदाराचे काम करणार नाही म्हणजे ते रखवादारीचे कामही करणार नाहीत आणि शिपायाचे झाडणकामही करणार नाहीत, चाव्याही घेणार नाहीत. कारण की, ते शिपाई आहेत ते रखवालदार नाहीत. परंतु ते रखवालदारांचे सगळे फायदे घेणार. शाळेचा प्रिमायसेस वापरणार, सुट्टयामध्ये त्यांचे कार्यक्रम घेणार. ते सगळे करतात. मी याबाबत मागे सुध्दा तक्रार केली होती. त्यावेळी त्यांची बदली केली होती आणि आता ते पुन्हा तिथे आले आहेत. ते लोक तेथील मुख्यध्यापकांचे ऐकत नाहीत. मुख्य म्हणजे या सगळया मुख्यध्यापकांच्याच तक्रारी आहेत. मग या सेवकांना कशासाठी तिथे ठेवायचे? त्यांच्या जर बदल्या झाल्या होत्या ते पुन्हा त्या जागी कसे काय गेले? आणि रखवालदारांच्या खोलीत शिपाई कसे काय राहतात?

मा.चेअरमन, जर शिपाई सेवक रखवालदारांच्या क्वॉटर्समध्ये रहात असतील तर, त्यांना ते रिकामे करायला लावू आणि मा.चेअरमन, ते सेवक पुन्हा त्याच ठिकाणी बदलून आले त्याबद्दल त्यांनी विनंती केली होती आणि बदलीसाठी अर्ज दिले होते.

मा.सौ.नंदा लोणकर–त्यांनी जर १५ वर्षे एकाच शाळेत काढल्यानंतर पुन्हा त्यांना तीच शाळा द्यायची का? मग बदल्यांना अर्थ काय आहे?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–ठीक आहे, क्वॉर्टर रिकामे करून दिले जाईल.

मा.सौ.नंदा लोणकर–क्वॉर्टरबाबत माझे काहीही म्हणणे नाही. परंतु ते शिपाई त्या शाळेमध्ये १५ वर्षे राहिले आहेत तरी सुध्दा पुन्हा त्यांची तिथेच बदली होत आहे.

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–ठीक आहे, याबद्दल खात्री करून त्यांची बदली केली जाईल.

मा.सौ.नंदा लोणकर–ते मुख्यध्यापकांचे ऐकत नाहीत, शिक्षकांचे ऐकत नाहीत मग त्यांना तिथे ठेवून उपयोग काय आहे?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.चेअरमन त्याबाबत मा.मुख्यध्यापकांचा अहवाल मागवू.

मा.सौ.नंदा लोणकर–त्या मुख्यध्यापक सुध्दा घाबरतात, त्या लेडीज आहेत. त्या तुम्हाला लेखी काय देणार? कारण त्या असे सांगतात की, मॅडम माझे नाव सांगू नका.

मा.राहूल तुपेरे–मा.अध्यक्षा, माझाही तोच विषय आहे. माझ्या शाळेमध्ये सुध्दा शिक्षक नाहीत. अन्यथा सरळ असे सांगा की, शाळेला लॉक लावावे.

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.चेअरमन, मागील दोन ते तीन वर्षात शिक्षकांची भरती झालेली नाही. अगोदरच्या पदवीधरच्या ज्या पदोन्नती बाकी होत्या त्या केल्या आहेत. स्टाफ अप्रुव्हलप्रमाणे केले आहे. सेवानिवृत्तीमुळे किंवा पदोन्नतीमुळे आता जागा रिकाम्या झालेल्या आहेत. आता यानंतर शाळा विलीनीकरणाचा प्रस्ताव दिलेला आहे. यामध्ये १७ शाळा आहेत. त्यातून शिक्षक उपलब्ध होतील. तो प्रस्ताव मा.आयुक्त साहेबांच्या कार्यालयाकडे दिलेला आहे. तो प्रस्ताव मान्य झाल्यानंतर त्यातून जे शिक्षक उपलब्ध होतील आणि मग शिक्षक दिले जातील.

मा.राहूल तुपेरे–आमच्या शाळेला उन्हाळयाच्या सुट्टीत शिक्षक देणार आहात का? मा.अध्यक्षा, आमच्या विद्यार्थ्यांचे जर नुकसान झाले तर त्याला जबाबदार कोण असणार आहे? यासाठी शिक्षणप्रमुख जबाबदार असणार आहेत का?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.अध्यक्षा, मा.आयुक्त साहेबांनी सदरचा प्रस्ताव, लिगल ओपिनियनसाठी विधी खात्याकडे पाठविला असून त्यांचा सल्ला आल्यानंतर हा प्रस्ताव मान्य होणार आहे.

मा.राजेंद्र शिळीमकर–शिक्षण मंडळामध्ये शिक्षक, स्टाफचे काम करीत असल्याचे दिसून येते. शिक्षण मंडळाकडे एकूण स्टाफ किती आहे?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–शिक्षण मंडळाकडे एकूण १०० चा स्टाफ आहे.

मा.राजेंद्र शिळीमकर–आपण चुकीचे उत्तर देत आहात. शिक्षण मंडळामध्ये देखील शिक्षक स्टाफचे काम करीत आहेत.

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)–मा.चेअरमन, माझ्या विभागात शिक्षक, स्टाफचे काम करीत नाहीत. कदाचित माध्यमिक शिक्षण विभागात तसे असेल परंतु प्राथमिक शिक्षण मध्ये अशी स्थिती नाही.

मा.अनिल राणे–काही हायस्कूल किंवा शाळेमध्ये अतिरिक्त शिक्षक आहेत का?

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)– एकूण मान्यतेचा विचार करता आता अतिरिक्त शिक्षक नाहीत आणि विलीनीकरण पाहता, तिथे शिक्षक अतिरिक्त होतात.

मा.राजेंद्र शिळीमकर–आपण जिथे विलीनीकरण करीत आहात, तिथे शाळा भरीत नाही का?

मा.अध्यक्षा–मा. सदस्यांच्या शाळेमध्ये शिक्षणप्रमुखांनी पाहणी करावी आणि तिथे शिक्षक उपलब्ध करून द्यावेत. याबद्दल मी मागील सभेत सुध्दा सांगितले होते. आपण शिक्षणप्रमुख म्हणून आपली जबाबदारी काय आहे? या बाबत मा.सभासद वारंवार तीन महिन्यांपासून तक्रार करीत आहेत. तुम्ही या शाळेमध्ये तातडीने शिक्षक उपलब्ध करून द्यावेत. आपण जर मा.सदस्यांच्या तक्रारीचे निराकरण करणार नसाल तर,शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीकडे मान्यतेसाठी आणू नये. त्यासाठी दुसरीकडून मान्यता घ्यावी.

मा.बबन दहीफळे (शिक्षणप्रमुख)– मा.चेअरमन, शाळा विलीनीकरण केल्यानंतर जिथे विद्यार्थी संख्या कमी आहे..

मा.अध्यक्षा–मला आपला खुलासा ऐकायचा नाही. आपण तातडीने आजच्या आज व्हिजीट करून तेथे परिस्थिती काय आहे याची पाहणी करावी. त्या शाळेबद्दल मा.सदस्य तक्रार करीत आहेत आणि त्या शाळेमध्ये जर शिक्षक कमी असतील तर त्यासाठी आपण कोणते नियोजन केले? याबाबतचे उत्तर पुढील मंगळवारच्या सभेमध्ये द्यावे.

मा.अनिल राणे–काही शाळांमध्ये अतिरिक्त स्टाफ आहे आणि याबद्दल त्यांच्यावर जर दबाव असेल तर आमच्या मागणीप्रमाणे त्यांनी अहवाल आमच्याकडे सादर करावा. आम्ही तुम्हाला त्याबाबतीत मदत करू, काही शिक्षक बदलीसाठी राजकीय दबाव वापरतात त्यामुळे यांच्यावर प्रेशर येत असेल, परंतु आपल्याला आवश्यक ठिकाणी शिक्षक देणे गरजेचे आहे.

मा.अध्यक्षा–त्यांना त्या ठिकाणची आवश्यकता आणि गांर्भीय लक्षात यायला पाहिजे. ते शिक्षणमंडळाचे प्रमुख अधिकारी आहेत. मा.सदस्य तीन महिन्यांपासून शिक्षकाची मागणी करीत आहेत आणि ते ही मागणी का पूर्ण करीत शकत नाहीत?

मा.राजेंद्र शिळीमकर–मा.शिक्षणप्रमुख यांच्या उत्तरावरून असे दिसून येते की, त्यांच्यावर राजकीय दबाब आहे आणि त्यामुळे ते अशी उत्तरे देत आहेत.

(सभागृहात गोंधळ होता.)

मा.राहूल तुपेरे–मी शिक्षक उपलब्ध होत नसल्यामुळे भांडत आहे. मी व्हिजीटसाठी फोन केला तरी देखील ते येत नाहीत व दुसऱ्या अधिकाऱ्यांना पाठवितात.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.शिक्षणप्रमुख आता आपणास मा.अध्यक्षांनी आदेश दिले आहेत. आपण त्या संबंधीत शाळेकडे व्हिजीट करावी तेथे किती शिक्षक कमी आहेत? त्यासाठी पुढील मंगळवारच्या आतमध्ये नियोजन करा आणि तेथे शिक्षक उपलब्ध करून द्यावेत.

मा.राहूल तुपेरे–आमच्या शाळेला जर पुढील आठवड्यापर्यंत शिक्षक मिळाले नाहीत तर आम्ही अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासणार आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये आम्ही तुमच्या बरोबर नसणार आहे.आपली मागणी मान्य करण्यासाठी अनेक मार्ग आहेत, आंदोलनाचे मार्ग आहेत परंतु हा मार्ग योग्य नाही. तुम्हाला जे आंदोलन करायचे आहे ते करा. परंतु आपण त्यांच्याकडून कायदेशीर आणि सन्मार्गाने आपण आपली मागणी करू. अधिकाऱ्याच्या तोंडाला काळे फासणे, हे मात्र आम्हाला मान्य नाही.

मा.सौ.शारदा ओरसे–पुणे महानगरपालिकेचे वकील कोणती कामे करतात? याबाबत माहिती द्यावी कारण महानगरपालिकेचे वकील महानगरपालिकेच्या विरोधात काम करतात.

मा.रविंद्र थोरात(विधी अधिकारी)–मनपाच्या पॅनेलवर १७ वकील आहेत आणि त्यांच्याकडे विविध केसेसचे कामकाज दिलेले आहे. आपण जर एखाद्या स्पेसिफिक केसबद्दल विचारणा केल्यास याबाबत माहिती देता येईल.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–याबाबत विधी अधिकाऱ्यांनी मा.सदस्यांची भेट घेऊन संबंधित केसचा पाठपुरावा करून त्याबद्दलची माहिती द्यावी.

मा.राजेंद्र शिळीमकर–फुरसुंगी कचरा डेपो येथे कॅपिंगच्या कामाचे ३८ ते ४० च्या आसपासचे टेंडर आहे आणि ते टेंडर पुण्यातील ठेकेदारांना भरता येत नाही कारण यामध्ये महापालिकेने काहीतरी वेगळ्या अटीशर्ती टाकल्या आहेत. सदरचे टेंडर बाहेरच्या लोकांना द्यायचे आहे का? त्यामध्ये नक्की काय करायचे आहे? ते टेंडर पुणे मनपाच्या कोणत्या कॉन्ट्रक्टरला का भरता येत नाही? याबाबत आम्हाला लेखी माहिती हवी आहे नाहीतर मग आता ऑनलाईनचे टेंडर थांबवावे किंवा त्याला मुदतवाढ देऊन, अटीशर्तीची सुधारणा करावी.

मा.सुरेश जगताप,उपायुक्त(घ.क.व्य.)–मा.चेअरमन, याबाबत माहिती घ्यावी लागेल.

मा.राजेंद्र शिळीमकर–तोपर्यंत हे थांबवावे. यामधील अटीशर्ती पाहून घ्याव्यात.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–यामध्ये टर्म ॲण्ड कंडीशन्समध्ये बदल करावयाचा आहे.

अशा पध्दतीने सभेचे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**उपनगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**